डॉ. कुणाल खेमनार भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, कोल्हापूर

कार्यालय : (०२३१) २६५५५९८
निवास : (०२३१) २६००४०६
फॅक्स : (०२३१) २६६८११३
ईमेल : ceozp.kolhapur@maharashtra.gov.in
वेबसाईट : www.zpkolhapur.gov.in

अ.शा पत्रक जिपको/जिपास्वमि/कावि- १७७/१७
जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष,
जिल्हा परिषद कोल्हापूर.
दि. ८/०६/२०१७

**विषय- नळ पाणी पुरवठा योजनांच्या प्रलंबित तक्रारी व अनुदान वितरणाबाबत..**

वरील विषयान्वये, नळ पाणी पुरवठा योजनांच्या तक्रारीबाबत आपणांकडून चौकशी अहवाल/माहिती मागविणेत आली होती, सदरची माहिती अद्यापही आपलेकडून अप्राप्त आहे. सदरची माहिती/चौकशी अहवाल आपले स्तरावरून प्राप्त होणे आवश्यक आहे. तसेच नळ पाणी पुरवठा योजनेच्या अनुदान वितरणासंबंधी दप्तरांच्या त्रुटींबद्दल पूर्तता करून घेणेसंबंधी आपणास कळवूनही आपण सदरची पूर्तता केलेली नाही. तसेच अनुदान मागणी करणेपुर्वी आपलेमार्फत नळ पाणी पुरवठा योजनेची दप्तर तपासणी करून दाखला दिला जातो. परंतु सदरचा दाखला दप्तर न तपासता देता असे माझे निदर्शनास आले आहे. कारण पाणी व स्वच्छता विभागामार्फत योजनेचे दप्तर तपासणीस मागवून घेतले असता ते वेळेत दिले जात नाही, तसेच दप्तर उपलब्ध झालेस खालील गंभीर स्वरूपाच्या त्रुटी आढळून येतात.

१) ग्रामसभा व समितीचे इतिवृत्त अद्ययावत नसणे.
२) रोजकीर्द न लिहिणे.
३) बँक पासबुक अद्ययावत न ठेवणे.
४) योजनेबाबत शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही न करणे.
५) योजनेचे काम पूर्ण झालेवर ताबापट्टी करताना ग्रामसभेची मान्यता न घेणे.
६) योजने बाबत जागांचे ७/१२ उतारे उपलब्ध नसणे.
७) योजना ग्रामपंचायतने ताब्यात घेतलेनंतर मालमत्ता नोंदवहीत नोंद नसणे इ .

( P.T.O )

यावरून नळ पाणी पुरवठा योजनांकडे आपण गांभीर्याने पाहत नसलेचे खेदाने नमूद करावेसे वाटते. सबब दफ्तर वेळेत उपलब्ध न केलेस निधी मिळण्यास होणाऱ्या विलंबास व योजना वेळेत पूर्ण न झालेने योजनेबाबत कायदेशीर बाब उद्भवल्यास याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.

**सोबत — प्रलंबित प्रकरणांची यादी.**

Khemnar
(डॉ.कुणाल खेमनार)

प्रति,
गटविकास अधिकारी
पंचायत समिती.